


साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

# विपश्यना

साधक (मराठी)

बुद्धवर्ष 2567, कार्तिक पौर्णिमा, 27 नोव्हेंबर, 2023 वर्ष 7 अंक 9

वार्षिक शुल्क रु. 100/- मात्र (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50)

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

## धम्मवाणी

**यो च पुब्बे पमज्जित्वा, पच्छा सो नप्पमज्जति।**
**सोमं लोकं पभासेति, अब्भा मुत्तोव चन्दिमा॥**

*– धम्मपदपालि 172, लोकवग्गो*

जो आधी प्रमाद करून (ही) नंतर प्रमाद करीत नाही, तो मेघमुक्त चंद्राप्रमाणे या लोकाला प्रकाशित करतो.

**आत्मकथन - 2**

## मणांचे ओझे उतरले

"हातच्या काकणाला आरसा कशाला?", "प्रत्यक्षाचे प्रमाण कसले?" या सिद्धांतानुसार विपश्यनेच्या व्यावहारिक प्रयोगात्मक पक्षावर शंका घेण्याचे कोणतेच कारण नव्हते. विपश्यनेचा सुखद परिणामच तिच्या उपयुक्ततेचे प्रत्यक्ष प्रमाण होते. विकार-विमोचन ही कोणत्या अंधमान्यतेची गोष्ट नव्हती, अनुभव-जन्य तथ्य होते. जस-जसे साधनेत खोलवर उतरत गेलो, तिचा सार्वभौमिक, वैज्ञानिक पक्ष स्पष्टहून स्पष्टतर होत गेला. परंतु तरीही मनावर संप्रदायवादी दार्शनिकतेचे खूप मोठमोठे लेप लागलेले असल्यामुळे सैधांतिक पक्षाला धरून वारंवार मनात शंका-कुशंका डोके वर काढत होत्या.

मार्ग तर खूप चांगला आहे. सुखद-परिणामकारक आहे. आशुफलदायी आहे. वैज्ञानिक आहे. सार्वजनिक आहे. परंतु आहे तर नास्तिकवादीच ना. माझ्यासारखा परम आस्तिक व्यक्ती कुठे नास्तिक बनला जाऊ नये, याची दाट शंका मनाला वारंवार भेडसावत होती.

ही त्या दिवसांतील गोष्ट आहे जेव्हाकी भारतातून विलुप्त झालेल्या बुद्ध-वाणीचे थोडेसे देखील अध्ययन केले नव्हते. या कारणामुळे हे देखील माहित नव्हते की बुद्धकालीन भारतातही नास्तिक शब्द अत्यंत निंदनीय होता. स्वत: भगवान बुद्धांनीही या शब्दाचा याच अर्थाने वापर केला होता. परंतु त्या दिवसात या शब्दाची व्याख्या काही वेगळीच होती. त्या दिवसात नास्तिक त्याला म्हणत होते की जो कर्म आणि कर्मफलाच्या नैसर्गिक सिद्धांताला मानत नव्हता. जो याला मानता होता तो आस्तिक म्हटला जात असे. कर्म आणि त्याच्या अनुसार कर्म-फळाला न मानणारे लोक या मताचे होते की ना कोणत्या चांगल्या कर्माचे फळ चांगले असते ना वाईट कर्माचे वाईट. लोकांची हत्या करत करत जरी नदीचे संपूर्ण पात्र प्रेतांनी भरून टाकले तरी त्याचे कोणते दुष्फळ नसते. अशा धर्मविरोधी वृत्तीचे लोक नास्तिक म्हटले जात असत. यावरूनच स्पष्ट होते की हा शब्द अत्यंत घृणित अर्थाने वापरला जात होता. काही कालावधी लोटल्यानंतर भगवान बुद्धांना याच शब्दाने धिक्कारण्यासाठी काही लोकांनी याचा अर्थच बदलवून टाकला. हे लोक आपल्या निजी स्वार्थांच्या वाईट प्रकारे आहारी गेले होते. भगवानांच्या शिकवणीत कोणतीच खोट नसल्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारांनी धिक्कारले जाऊ शकत नव्हते. त्यांनी जन्मावर आधारित असलेल्या समाजाच्या चातुर्वर्णी व्यवस्थेला नाकारले होते. काही लोकांना ही बाब खूप खटकणारी वाटत होती. चातुवर्णी व्यवस्थेच्या प्रामाणिकतेसाठी ते आपल्या धर्म-शास्त्रांचा हवाला देत होते की जी भगवानांना पूर्णपणे अमान्य होती. अशा लोकांनी नास्तिक शब्दाच्या लाठीने भगवान बुद्धांवर प्रहार करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी त्याचा अर्थ बदलवून टाकला. आता त्याचा अर्थ असा करून टाकला की नास्तिक तो जो वेद वाणीला प्रमाण मानत नाही आणि आस्तिक तो जो तिला प्रमाण मानतो. ही व्याख्या काही लोकांना स्वीकार्य झाली असावी, काहींना नाही. कारण की वेदांमध्ये हिंसक यज्ञांचे विधानही होते ज्याची मान्यता देशातून पूर्णपणे समाप्त झाली होती. तेव्हा कालांतराने भगवान बुद्धांवर आक्रमण करण्यासाठी नास्तिक शब्दाचा एक नवीन अर्थ प्रचलित केला गेला. तो हा की जो आत्मा आणि परमात्म्याच्या अस्तित्वाला स्वीकारत नाही तो नास्तिक, जो स्वीकारतो तो आस्तिक. हळूहळू हाच अर्थ समाजात सर्वव्यापी झाला, सर्वमान्य झाला.

मी देखील या चुकीच्या अर्थांनी प्रभावित होऊन शंकाळू बनून गेलो. आत्मा आणि परमात्म्याच्या अस्तित्वाला न स्वीकारून नास्तिक बनणे म्हणजे माझ्या दृष्टीने अधार्मिक बनणे होते. विपश्यनेत हजार चांगल्या गोष्टी असल्या तरी मी अधार्मिक अजिबात बनू इच्छित नव्हतो. विपश्यनेने माझे जीवन बदलून गेले, मनोविकारांपासून विमुक्ती प्रदान करत निश्चितच चांगल्या गोष्टींकडे वळवले. तरीही या आस्तिक, नास्तिक शब्दांच्या चुकीच्या व्याख्येमुळे मनात एक काटा टोचत राहिला. मनावर एक ओझे असल्यासारखे वाटत होते.

तसे तर माझ्या मनातही आत्मा आणि परमात्म्याविषयी शंका उठत असत. हा आत्मा काय आहे, कसा आहे? याच्याविषयी काहीच स्पष्टता

नव्हती. मला माहित होते की भारताची एक परंपरा आत्म्याला इतके मोठे मानते जितके मोठे शरीर असते. म्हणजे, हत्तीचा आत्मा हत्तीच्या शरीराएवढा, मुंगीचा आत्मा मुंगीच्या शरीराएवढा, मनुष्याचा आत्मा मनुष्याच्या शरीराएवढा. सर्व आत्म्यांचे मोजमाप एकसारखे नाही. तेव्हा प्रश्न पडायचा की मरण पावल्यानंतर हत्तीचा इतका मोठा आत्मा मुंगीच्या इवल्याश्या शरीरात कसा प्रवेश मिळवू शकत असेल? आणखी एक मान्यता ही पण चालत आली आहे की आत्मा अंगुष्ठ-प्रमाण म्हणजे अंगठ्याएवढा मोठा आहे. कोणाच्या अंगठ्याएवढा मोठा? जर मनुष्याच्या अंगठ्याएवढा मोठा आत्मा असेल तर मुंगीच्या शरीरात कसा सामावला जाईल बरे! तेव्हा असे मानले गेले की ज्या प्राण्याचा आत्मा असेल तो त्या प्राण्याच्या अंगठ्याएवढा असेल. म्हणजे सर्व आत्मे एका मोजमापाचे नसतील, त्यांच्यात एकरूपता नसेल. हत्तीचा आत्मा हत्तीच्या शरीराएवढा न होता त्याच्या अंगठ्या एवढा असेल. तरीही असा आत्मा हत्तीचे जीवन सोडून मुंगीच्या योनित जन्मला तर मुंगीच्या शरीरात कसा सामावेल बरे! त्याकरीता एक मान्यता ही चालली की आत्मा तीळा एवढा मोठा आहे. परंतु पुन्हा अडचण आली की अनेक प्राणी तीळाहूनही लहान असतात. तीळाएवढा देखील आत्मा त्यांच्या शरीरात सामावू शकत नाही. तेव्हा एक मान्यता ही चालली की आत्मा केसाच्या टोका इतका छोटा आहे. पण अनेक अदृश्य जीव इतके छोटे असतात की केसाच्या टोकावर करोडोंच्या संख्येने सामावले जातील. अशा प्रकारे आत्म्याला घेऊन वेगवेगळ्या मान्यतांमुळे मनात अनेक शंका तर जागतच होत्या परंतु या सर्व शंकांना दूर करणारी एक गोष्ट प्रबळ रूपाने समोर येत होती आणि वारंवार येत होती– ती ही की जर आत्माच नाहीये तर पुनर्जन्म कोणाचा होतो? शरीर आणि चित्त दोन्हीही तर नश्वर आहेत? काहीतरी तर असे अविनाशी तत्व असले पाहिजे की जे एका योनितून दुसऱ्या योनित जन्म घेत घेत चौराऐंशी लाख योनिंमधून भटकत फिरत असते. भले भिन्न-भिन्न योनिंमध्ये त्यांच्या अनुकूल आपला आकार बदलत असेल, परंतु जोपर्यंत त्याची मुक्ती होत नाही, तोपर्यंत तो भिन्न-भिन्न योनिंमधून तर भटकतच राहिल. जर पुनर्जन्माला मानले तर आत्म्याच्या अस्तित्वाला मानावेच लागेल. ही तर मोठी चुकीची गोष्ट होईल की पुनर्जन्मही मानायचा आणि आत्म्याच्या अस्तित्वालाही नाकारायचे. हा तर्क मला त्या दिवसात मोठा बलवान वाटत होता. त्यामुळे विपश्यनेच्या व्यावहारिक पक्षाला शंभर टक्के स्वीकारतानाही तिचा सैद्धांतिक पक्ष पूर्णपणे गळ्याखाली उतरत नव्हता, आत्म्याच्या अस्तित्वाला न मानण्याची गोष्ट एकसारखी खटकत होती.

जवळजवळ अशीच गोष्ट ईश्वराच्या मान्यतेसंबंधीही होती. ईश्वराच्या अस्तित्वावर श्रद्धा असूनही अनेक प्रश्न मनात येत असत. कोणाची मान्यता अशी आहे की तो निर्गुण, निराकार आहे. परंतु कोणाची मान्यता आहे की तो सगुण, साकार आहे. जर तो साकार आहे तर त्याचा आकार कसा आहे? काय तो गोरा आहे की काळा? दोन हातांचा आहे की चार हातांचा, की शंभर हातांचा? काय तो भारतीय ईश्वराप्रमाणे बिना दाढी-मिशीवाला, अर्धनग्न आणि अनेक आभूषणांनी, अलंकारांनी अलंकृत असलेला सुंदर तरुण व्यक्ती आहे की पश्चिमेच्या ईश्वराप्रमाणे पांढराशुभ्र लांब झगा घातलेला; सफेद लांब दाढी-मिशी असलेला कोणी वयोवृद्ध व्यक्ती आहे? काय वेगवेगळ्या संप्रदायवाल्यांचा वेगवेगळा ईश्वर असतो किंवा ईश्वर एकच आहे? जर एकच असेल तर मग हिंदु, मुसलमान, यहूदी, ख्रिश्चन, शीख इत्यादी लोक जेव्हा आपापसात भांडतात, हत्या करतात, जाळपोळ करतात, देवस्थानांचा विध्वंस करतात तेव्हा आपापल्या ईश्वराच्या नावानेच करतात ना. तर मग तेव्हा तो ईश्वर काय नुसता असहाय्य बनून पाहतच राहतो? काहीच करू शकत नाही? काय खरोखरच तो दुर्बळ आहे, असहाय्य आहे? की जसे लोक समजतात की तो सर्वशक्तीमान आहे? तर मग काय तो आपल्या अनुयायांच्या अत्याचारांना पाहून आनंदी होतो की दु:खी होतो? जर दु:खी होत असेल तर त्यांना रोखत का नाही? त्यांना शिक्षा का करत नाही? काय खरोखर तो न्यायी आहे, कृपाळू आहे? जर तसा असेल तर त्याने अशा घाणेरड्या चातुर्वर्णी व्यवस्थेची निर्मिती का केली? अशी व्यवस्था जिच्यात एक वर्ण पिढ्यानुपिढ्या इतर वर्णांच्या अत्याचारांमध्ये भरडण्यासाठी विवश केला गेला. अशा प्रकारे एक विशेष वर्ण इतर वर्णांच्या तुलनेने अधिक सुविधांचा हक्कदार बनून बसला. या अन्यायात, अत्याचारात त्या ईश्वराचाही हात असेल तर तो ईश्वर न्यायी आणि कृपाळू कसा झाला?

ईश्वरासंबंधी असे आणि याच्यासारखे अनेक प्रश्न मनात काथ्याकूट करीत राहायचे. त्या दिवसांत माझ्या कवितांमधून असल्या अभद्र सामाजिक व्यवस्थेच्या विरुद्ध निखारे फुटत असायचे. अशा निरर्थक चातुर्वर्णी सामाजिक व्यवस्थेच्या विरोधात, तेव्हा रचलेल्या कवितेच्या काही ओळी अजूनही आठवतात –

**ब्राह्मण, बनिये के घर जन्मे, इससे ही क्या हम हैं महान?**
**हम उच्च वर्ण, हम सर्वश्रेष्ठ, ऊंचा समाज में बना स्थान॥**
**पुरखोंसे उनके पल्ले ही, सेवा का भार दिया हमने।**
**वे भोले मूक मुनज उनसे, क्या-क्या ना काम लिया हमने?**
**वे रखते हमको स्वच्छ साफ, रह स्वयं घिनौने जीवन में।**
**जिनकी मेहनत के बल पर हम, बाबू, छैले बनते मन में॥**
**वे हैं अछूत, अस्पृश्य, नीच, उनको समाज में ना स्थान।**
**वे जन्मजात पद-दलित रहें, उनका कैसा मानापमान?**
**हम उच्च वर्ण हैं, अत: सुरक्षित हैं हमको सर्वाधिकार।**
**मंदिर, देवालय, धर्मस्थान, ईश्वर तक पर एकाधिकार॥**
**सब कुएं, बावड़ी अपने हैं, सड़कों तक पर चलने ना दें।**
**गर वश चल जाए तो उनको, पृथ्वी और पवन न छूने दें॥**
**मैं पूछ रहा आखिर यह सब, किस न्याय, नीति के बल पर है?**
**हम बने धर्म के कर्णधार, इस अनाचार में तत्पर हैं॥**
**मैं सोचा करता कभी-कभी, क्या परमेश्वर भी मिथ्या है?**
**चुपचाप देखता रहता वह, हो रहा यहां पर क्या क्या है ।**
**हम इतना अत्याचार करें, निकले उसकी आवाज नहीं।**
**धरती न फटे, नभ ना टूटे, गिरती हम पर क्यों गाज नहीं?**
**वह ईश नहीं, जगदीश नहीं, वह सच्चा धर्म, पुराण नहीं।**
**जिसके आदेशों में मानव को, है समता का स्थान नहीं॥**

...इत्यादी इत्यादी

एकीकडे मनात अशा विद्रोही विचारांचे झंझावात उठत होते, दुसरीकडे आस्तिक बनून राहण्यासाठी प्रबळ तर्क चालत होते. जर या सृष्टीला रचणाऱ्या कोण्या स्रष्टा ईश्वराचे अस्तित्वच नाही तर ही महान आश्चर्यजनक सृष्टी बनली कशी? सृष्टी-चक्र ज्या नियमांनी बांधले गेले आहे त्या नियमांचा कोणीतरी नियामक तर असेल ना. जगातील महानहून महान आणि अणुपासून परमाणुपर्यंत, सजीव-निर्जीव सर्वांवर

जे विश्व-विधान लागू होते, त्याचा कोणीतरी विधायक तर असेल?

आत्मा आणि परमात्म्या संबंधी अशा प्रकारच्या दुविधेमध्ये दोन वर्षे निघून गेली. हे तिसऱ्या वर्षातील तिसरे शिबिर होते. अधिष्ठानच्या वेळी अचानक एक विचार विजेसारखा चमकून गेला. आतून एक बोध जागला– जीवनाचे लक्ष्य विकृत चित्ताला विकारांपासून विमुक्त करायचे आहे, ना की त्याला या चूक की बरोबरच्या दार्शनिक मान्यतांमध्ये गुंतवून ठेवायचे आहे. या मान्यतांचा मनाच्या विकारांशी काय संबंध आहे? किती अप्रासंगिक आहेत या सर्व दार्शनिक मान्यता? आत्मा आणि परमात्म्याच्या दार्शनिक मान्यतांना जन्मापासून मानत आलो आहे. त्याच्या मानण्यामात्रने मनाचे विकार तर जरादेखील निघाले नाहीत ना? माझ्यासारखे कितीतरी लोक आस्तिक असण्याचा दंभ भरतात परंतु विकारांनी तर पिडीतच राहतात. दुसरीकडे आत्मा आणि परमात्म्याला न मानणारे कितीतरी विपश्यी माझ्यासमोर आहेत ज्यांच्यातून कोणी स्रोतापन्न आहे, कोणी सकदागामी आहे ज्यांनी इंद्रियातीत अमृताचा स्वत: साक्षात्कार केला आहे, ज्यांच्या मनाच्या विकृती दुर्बल झाल्या आहेत. माझ्यासमोर काहीएक अनागामीही आहेत ज्यांची कामवासना मुळापासून निघून गेली आहे आणि जे सहजभावाने विशुद्ध ब्रह्मचर्याचे जीवन जगत आहेत. माझ्या समोर कमीतकमी एक असा व्यक्तीही आहे ज्याने अरहंत अवस्था प्राप्त केली आहे. अरहंत असण्याची सारी लक्षणे त्याच्यात विद्यमान आहेत. ज्याला 'नास्तिकता' म्हटले जाते ती या सर्वांच्या आध्यात्मिक प्रगतीमध्ये बाधक बनली नाही. जे माझ्यासारखे आपल्या स्वत:ला 'आस्तिक' म्हणण्याचा दंभ भरतात, त्यांना ही आस्तिकता विकार विमुक्ती मध्ये थोडीशीही सहायक बनू शकली नाही, आध्यात्मिक उन्नतीमध्ये जरादेखील सहायता देऊ शकली नाही. तर मग अशी अप्रासंगिक, असंगत मान्यता काय कामाची?

याबरोबरच बुद्धीवर आणखी एक विचार प्रकटला की शेवटी मी काय करीत आहे? शील, सदाचार पालन करण्याचा भरपूर प्रयत्न करीत आहे. मनाला श्वासाच्या सत्यतेसहित एकाग्र करण्याचा अभ्यास करीत आहे. शारीरिक संवेदनांच्या आधारावर विकारांच्या उत्खननाचे काम करीत आहे. जर खरोखरच कोणी ईश्वर असेल तर तो खूप आनंदीच होईल. मला शील, समाधी आणि प्रज्ञेमध्ये स्थापित झालेले पाहून नाराज कसा होईल भले! आणि जर तो ईश्वर भयभीत मानवाचा मानस-पुत्रच असेल अथवा या पुरोहितवर्गीय पॉवर-ब्रोकरांचे केवळ केंद्रच असेल तर या मान्यतेचे खोटे ओझे का आपल्या डोक्यावर घेऊन फिरू? याच प्रकारे शरीराच्या आतमध्ये जर कोणता आगळावेगळा आत्मा असेल तर विकार-विमुक्तीच्या अभ्यासात त्या बिचाऱ्याचे कल्याणच होईल ना आणि जर तो अस्मिता भावाच्या प्रति आसक्त असलेल्या लोकांची केवळ एक कल्पनामात्रच असेल तर या काल्पनिक मान्यतांचे खोटे ओझे डोक्यावर घेऊन का फिरत बसू?

जशी ही शुद्ध मनात जागली त्याच क्षणी आत्मा, परमात्म्यासंबंधी सारा ऊहापोह समाप्त होऊन गेला. असे वाटले जणू मनावरील मणा-मणांचे ओझे उतरून गेले. मन इतके हलके-फुलके झाले की त्यामुळे आध्यात्मिक मार्गावरील पुढची यात्रा सोपी झाली, सुगम झाली आणि जस-जशी आध्यात्मिक प्रगती होत गेली, आत्मा आणि परमात्म्याचा सारा प्रपंच अधिक स्पष्ट होत गेला. आस्तिकता आणि नास्तिकतेचा सारा गुंता सुटत गेला. आता चित्त-संततीच्या प्रवाहालाच आत्मा स्वीकारण्यात काही अडचण राहिली नाही. सत्याला ईश्वर आणि परमसत्याला परमेश्वर स्वीकारण्यात काही अडचण राहिली नाही. सद्धर्मच ती सार्वभौमिक, सार्वकालिक परम शक्ती आहे जी सर्वव्यापी आहे, घट-घटवासी आहे, अंतर्यामी आहे, निर्गुण आहे, निराकार आहे, अगम आहे, अगोचर आहे, अलख आहे, निरंजन आहे– जिची हुकूमत सजीव-निर्जीव सर्वांवर चालते, जिने अणू-अणूला धारण केले आहे, अणू-अणूने जिला धारण केले आहे, जिने सारे ब्रह्मांड धारण केले आहे, साऱ्या ब्रह्मांडाने जिला धारण केले आहे, जिच्या विस्मयजनक विधानाच्या आधारावर सूर्य, चंद्र, तारे आणि साऱ्या आकाश-गंगा संचलित होत असतात, जिच्या नैसर्गिक नियमांच्या आधारावर समग्र संसाराचे संसरण होत असते; उत्पत्ती होते, स्थिती होते, लय होतो, सृजन होते, प्रलय होतो– तिलाच अवैयक्तिक सत्ता स्वीकार करण्यात आता कुठेही, कसलीही अडचण राहिली नाही. खूप कल्याण झाले, खरोखरच खूप मोठे कल्याण झाले या अंतर्बोधातून!

कल्याणमित्र,

सत्यनारायण गोयंका.

*(– वर्ष 23, बुद्धवर्ष 2537, आश्विन पौर्णिमा, 29-10-1993, अंक 5)*

------------------------

| नवे उत्तरदायित्व<br>वरिष्ठ सहायक आचार्य | नव नियुक्ती<br>सहायक आचार्य |
|---|---|
| 1. श्रीमती ज्योति मोलिया, गुजरात | 1. श्री रवीन्द्र कुलकर्णी, पुणे |
| 2. श्रीमती उमा पटेल, गुजरात | 2. श्रीमती मनीषा प्रदीप पाटिल, जळगांव |
| 3. श्रीमती स्मिता मुकेश वोरा, गुजरात | 3. श्रीमती नीलिमा बन्सोड, रायपुर (छत्तीसगढ) |
| 4. श्री देवीदास वाधवानी, गुजरात | 4. श्री विनोद जोशी, जयपुर |
| | 5. Mr. Dong YU, China |
| | 6. Mr. Wang Dan DU, China |

## पॅगोड्यावर रात्रभर प्रकाशाचे महत्व

पूज्य गुरुजी वेळोवेळी म्हणत असत की एखाद्या **धातु-गब्भ** पॅगोड्यावर रात्रभर प्रकाश असण्याचे विशेष महत्व आहे. यामुळे सारे वातावरण दीर्घकाळ धर्म व मैत्री तरंगांनी भारलेले राहाते. तात्पर्य आपल्या नातेवाईकांच्या आठवणी निमित्ताने ग्लोबल पॅगोड्यावर प्रकाश दानासाठी प्रती रात्री रुपये 5000/- निर्धारित केले गेले आहेत.

**Bank Details:** 'Global Vipassana Foundation' (GVF),
Axis Bank Ltd., Sonimur Apartments,
Timber Estate, Malad (W), Mumbai - 400064,
Branch- Malad (W). Bank A/c No.- 911010032397802
IFSC No.- UTIB0000062 Swift code: AXIS-INBB062
अधिक माहितीसाठी संपर्क – 1. Mr. Derik Pegado, 9921227057,
2. Sri Bipin Mehta, Mo. 9920052156 Email: audits@globalpagoda.org

### ग्लोबल विपश्यना पगोडा, गोराई, मुंबईमध्ये

**1. एक दिवसीय महाशिबिर (Mega Course) कार्यक्रमः**

1. रविवार 19 नोव्हेंबर 2023 शताब्दी वर्ष महाशिबिर
2. रविवार 10 डिसेंबर 2023 शताब्दी वर्ष महाशिबिर
3. रविवार 14 जानेवारी 2024 संघदान आणि महाशिबिर
4. रविवार 04 फेब्रुवारी, मेगा इवेंट-**'डॉक्यूमेंट्री फिल्म'** चे विमोचन व अन्य कार्यक्रम

**Online registration:** *http://oneday.globalpagoda.org/register* **Email:** *guruji.centenary@globalpagoda.org* or *oneday@globalpagoda.org*

इतर कोणत्याही प्रकारच्या माहितीसाठी संपर्कः
*info@globalpagoda.org* or *pr@globalpagoda.org*

## विपश्यना विशोधन विन्यास द्वारा "पाल" योजना

**प्रिय धर्म परिवार,** गुरु पौर्णिमेच्या या प्रसंगी विपश्यना विशोधन विन्यासद्वारे प्रोजेक्ट "पाल" – धर्माचा खजिनाची घोषणा करताना खूप आनंद होत आहे.

जसे की आपण सर्व जाणता की या अनमोल धर्माला आचार्यांच्या शुद्ध परंपरेद्वारे सांभाळून ठेवले गेले आणि पूज्य एस. एन. गोयंकाजींद्वारे याच्या प्राचीन शुद्धतेसह आपल्याला दिला गेला, ज्याला अनेकांच्या लाभासाठी सांभाळून सुरक्षित ठेवण्याची आणि भविष्यातील पिढ्यांना याला शुद्ध रूपामध्ये प्रदान करण्याची आवश्यकता आहे. म्यंमा वरुन आणलेली ताडपत्रे आणि हस्तलिपी, दुर्लभ पुस्तके, छायाचित्र, विविध कलाकृती, ऑडिओ आणि व्हिडिओ टेपच्या रूपात दुर्लभ सामग्रीचा विशाल खजिना उपलब्ध आहे. यात गोयंकाजींचा अति दुर्लभ असा व्यक्तिगत संग्रह सुद्धा सामील आहे.

**'पाल'-धर्माच्या खजिन्याचे विवरण–**

- छायाचित्र, प्रतिमा – 20,000 पेक्षा अधिक
- ऋणात्मक (निगेटिव्हस्) – 8,000 पेक्षा अधिक
- पत्र, दस्तावेज़ आणि प्रतिलेख – 2,10,000 पेक्षा अधिक
- समाचार पत्र, मासिक पत्रिका – 10,000 पेक्षा अधिक
- डायरी आणि नोटबुक्स – जवळजवळ 500
- मुद्रित पुस्तके – 12,000 पेक्षा अधिक
- ताडपत्रे आणि हस्तलिपि – जवळजवळ 28
- ऑडियो आणि व्हिडियो टेप संग्रह – 3, 000 पेक्षा अधिक
- पेंटिंग्स – बुद्धांच्या जीवनावर 130 पेक्षा अधिक मोठी चित्र सांभाळून ठेवली आहेत.
- शिबिर आवेदन फॉर्म – 12 लाखापेक्षा अधिक (काही फॉर्म 1971 चे आहेत.)

या सामग्रीला पर्यावरणीय परिस्थितीमुळे होणाऱ्या नुकसानीच्या जोखमीपासून वाचवण्यासाठी परियोजना 'पाल', जिचा अर्थ आहे धम्म शिकवणीला सुरक्षित ठेवणे, सांभाळून ठेवणे, एक अत्याधुनिक संरक्षण सुविधेची योजना बनवली गेली आहे, जी जवळपास 5,000 वर्ग फुट (Sq ft) क्षेत्रामध्ये असेल. यात तापमान नियंत्रित वातावरणाबरोबर आग-प्रतिरोधी स्टोअरची सुविधा असेल. वरील मजल्यावर असल्यामुळे ही पाण्यापासून सुद्धा सुरक्षित असेल.

या परियोजनेवर जवळपास 300 लाख रुपये खर्च होण्याचे अनुमान आहे. येणाऱ्या पिढ्यांच्या हितासाठी या पुण्यदायी कार्याकरीता आपले योगदान महत्वपूर्ण ठरेल.

कृपया प्रोजेक्ट 'पाल' 'धर्माचा खजिना' चा एक लघु व्हिडियो पाहण्यासाठी खालील युट्युब लिंक वर क्लिक करा: https://youtu.be/eK-dJPWnOhs

आमची वेबसाइट, मोबाइल ॲप, स्कॅन, यूपीआय, क्यू आर कोड, नेट बँकिंग द्वारा कोणीही ऑनलाइन दान करु शकतात किंवा आमच्या पत्त्यावर चेक पाठवू शकतात.

दान विकल्पांसाठी लिंक: https://www.vridhamma.org/Donation-to-VRI

VRI ला दान दिल्यावर भारतीय नागरिकांना 100% आयकर सुटीचा लाभ होतो.

**सर्वांचे मंगल होवो!**

विपश्यना विशोधन विन्यासला दान देण्यासाठी बँक विवरण या प्रकारे आहे–
विपश्यना विशोधन विन्यास, ॲक्सिस बँक लि., मालाड (प.)

खाते क्र. 911010004132846; IFSC Code: UTIB0000062

संपर्क- 1. श्री डेरिक पेगाडो - 022-50427512/ 28451204
2. श्री बिपिन मेहता - 022-50427510/ 9920052156
3. ईमेल - audits@globalpagoda.org
4. वेबसाइट- https://www.vridhamma.org/donate-online

## दोहे धर्माचे

आप-आपल्या कर्मांना, आपण जबाबदार।
आपल्या सुख-दु:खांना, कोण रे जबाबदार?

आस परकी सोड अरे, कर्मे आपली सुधार।
विपश्यनेच्या गंगेने, धुवून टाक विकार॥

मानव जीवन रत्नासम, करू नको बरबाद।
तज प्रमाद, पुरुषार्थ कर, चाख मुक्तीचा स्वाद॥

परावलंबन दुख जागवे, स्वावलंब सुख होय।
आपल्या पायावर चला, लक्ष्याची प्राप्ती होय॥

## दोहे धर्माचे

खोटी कुडी कल्पना, दर्शनाचे जंजाळ।
आस पूर्ण होत नसे, राही हाल बेहाल॥

अंतर्मनात मळाच्या, गाठी बांधत जाई।
करे कल्पना मुक्तीची, मुक्ती हाती न येई॥

गोड गोड रे कल्पना, गोड गोड रे आस।
सत्य पाहू शकत नसे, होई आस निराश॥

माने कर्म न कर्म फळ, तोच नास्तिक होय।
कर्म फळाच्या नियमाला, माने, आस्तिक होय॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक, मुद्रक व संपादक: राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनी: (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, 259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2567, श्रावण पौर्णिमा अधिक, 1 ऑगस्ट 2023

वार्षिक शुल्क रु. 100/-, US $ 50, (भारताबाहेर पाठविण्यासाठी) रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK/286/2021-2023

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.) **(किरकोळ विक्री होत नाही)**
**DATE OF PRINTING:** 15 JULY, 2023, **DATE OF PUBLICATION: 01 AUGUST, 2023**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
फोन : (02553) 244076, 244086,
244144, 244440.
Email: vri_admin@vridhamma.org;
Course Booking: info.giri@vridhamma.org
Website: www.vridhamma.org